संचालनालयाचे बळकटीकरण अंतर्गत विभाग व जिल्हा स्तरावरील रिक्त पदांवर महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग (गट-क) मधील कर्मचाऱ्यांचे प्रतिनियुक्तीने पदस्थापना करणेबाबत

## नगरपरिषद प्रशासन संचालनालय

७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
क्र.नपप्रसं-२०२५/कक्ष-३/संवर्ग-कर्म/बदली/ ४२४१
दिनांक - 30 MAY 2025

संदर्भ -:

१. संचालनालय बळकटीकरण शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.१३९/नवि-१४, दि.०५-०८-२०२०
२. महाराष्ट्र नगरपरिषद / नगरपंचायत औद्योगिक नगरे राज्यसेवा (समावेशन, सेवाप्रवेश व सेवाशर्ती) नियम, २००६
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र एमसीओ-२०१७/प्र क्र ११९/नवि-१४, दि ११-०५-२०१७
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र एसआरव्ही-२०११/प्र क्र १३७/कार्या-१२, दि १७-१२-२०१६
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र एसआरव्ही-२०१६/प्र क्र ५१०/कार्या-१२, दि १६-०२-२०१८
६. संचालनालयाचे पत्र क्र नपप्रसं २०२५/संवर्ग कर्म/बदली/प्रस्ताव/३०८ दि ०९ जाने २०२५, क्र ३११० दि ०४ एप्रिल २०२५, क्र ३३४१ दि २१ एप्रिल २०२५
७. अवर सचिव नवि १४ नगर विकास विभाग यांचे पत्र क्र एमसीओ २०२५/प्र क्र १७७/नवि १४ दि १९-०५-२०२५

## :प्रतिनियुक्ती आदेश :

०१ उपरोक्त वाचा क्र १ च्या शासन निर्णयान्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे बळकटीकरण करण्यात आले असून संचालनालयाच्या मुख्यालय, विभागीय स्तर व जिल्हा स्तरावरील आकृतीबंध सुधारीत करण्यात आला असून एकूण ५०३ स्थायी पदांना सुधारीत आकृतीबंधानुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे विभागीय स्तर व जिल्हा स्तरावर विविध पदे रिक्त आहेत. त्यामुळे विभागीय व जिल्हा पातळीवर नगरपरिषदा तसेच नगरपंचायतीच्या कामकाजावरील सनियंत्रण व पर्यवेक्षण यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

०२ महाराष्ट्र नगरपरिषद संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या विशेष बाब म्हणून करावयाच्या बदल्यांबाबत वाचा क्र ६ अन्वये लगतचे वरिष्ठ प्राधिकारी म्हणून मा प्रधान सचिव, नवि-२ यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने वाचा क्र ७ च्या पत्रान्वये सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे.

०३ सबबवाचा क्र ४ व ५ मधील शासन निर्णयातील तरतुदींनुसार महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग कर्मचाऱ्याची खालील तक्त्यात नमूदप्रमाणे रकाना क्र ५ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग व श्रेणी | सद्या कार्यरत नगरपरिषद | प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आलेले पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | महेश पंडीत कवटे | लेखापाल लेखापरीक्षक श्रेणी अ | श्रीरामपूर जि अहिल्यानगर | लेखापाल/ लेखापरीक्षक, नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर |

१. सदरची प्रतिनियुक्ती ही महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील तरतुदी आणि खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.
२. सदरची प्रतिनियुक्ती ही ३ वर्ष कालावधीसाठी करण्यात येत आहे.
३. जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने या संचालनालयास आवश्यक वाटली नाही तर कोणत्याही वेळी त्यांना त्यांच्या मूळ विभागाकडे संवर्गातील पदावर पाठविण्यात येईल
४. संबंधित कर्मचारी यांना सध्याच्या कार्यरत पदावरुन दि३०-०५-२०२५ रोजी (म.नं) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. मुख्याधिकारी यांनी रिक्त राहणाऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार संवर्गातील इतर कर्मचाऱ्यास देण्यात यावा.
५. संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी पदस्थापना दिलेल्या ठिकाणी दि०२ - ०६ -२०२५ रोजी रुजू होऊन तसा आपला अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा.
६. संबंधित अधिकारी/कर्मचारी हे कार्यमुक्त झाल्यानंतर पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास व परस्पर रजेवर गेल्यास ती रजा अनधिकृत समजण्यात येवून संबंधित कर्मचाऱ्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
७. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे प्रतिनियुक्तीनंतरचे वेतन व भत्ते बदलीने पदस्थापना होणाऱ्या कार्यालयातून काढण्यात यावेत
८. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विशेष बाब म्हणून प्रतिनियुक्ती केलेली असल्याने त्यांना बदलीप्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
९. या आदेशान्वये केलेली पदस्थापना रद्द करणे, त्यात बदल करणे यासाठी कोणत्याही प्रकारचे दडपण / दबाव आणू नये. तसे केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम २३ नुसार शिस्तभंगाची कारवाई होऊ शकेल याची संबंधित कर्मचाऱ्याने नोंद घ्यावी.

(मनोज रानडे भा प्र से)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

**प्रत:**

१. मा प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव
२. उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, नवि-१४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय
४. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (संबंधित)
५. संबंधित कर्मचारी